


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २९० वा सोमवार दि ०२ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाईचे शासनाचे आदेश...

## सरकारच्या आदेशामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांचे व देणाऱ्याचे धाबे दणाणले

## जिल्हा परिषद मध्ये दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी नियमानुसार होत नसल्याची चर्चा

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन दिव्यांगांचे लाभ उपटणाऱ्या उपटसुंभांना आता थेट फौजदारी कारवाईचा दणका देण्याच्या तयारीत राज्य शासन आलेले आहे. या कारवाईसंदर्भात शासनाने एक निर्णय घेतला असून, लवकरच त्याची अंमलबजावणी सुरू आहे. राज्यभरात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन धडधाकट लोक लाभ उपटत असल्याचे समोर आल्यानंतर शासनाला जाग आली असून, या निर्णयामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांची आता खैर नाही. बुलढाणा जिल्ह्यातही बोगस प्रमाणपत्र घेऊन काम करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांबाबत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यापूर्वीच प्रकाश टाकलेला आहे. दैनिक जनसंचलनच्या हाती आलेल्या अधिकृत माहितीनुसार बुलढाणा जिल्हा परिषदेअंतर्गत तब्बल ५५५ शिक्षक हे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन कार्यरत असल्याची खात्रिलायक माहिती आहे. तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी काही सामाजिक कार्यकर्ते व सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या दबावामुळे जिल्ह्यातील दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त शिक्षकांची परत तपासणी करण्याचे काही दिसापूर्वी आदेश दिले होते. यासंदर्भातील तपासणी ही मुंबईच्या जे. जे. हॉस्पीटलमध्ये करण्यासंदर्भातही त्यांनी बजावले होते.मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून यासंदर्भात कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. ही अंमलबजावणी होऊ नये, यासाठी जिल्हा परिषदेत मोठे लॉबिंग करण्यात आलेले आहे. कारवाई दाबून ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांशी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारकांनी अर्थपूर्ण सेटिंग केल्याची यामध्ये दाट शक्यता आहे.




दिव्यांग प्रमाणपत्र घेतलेल्यांची परत तपासणी करावी, यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा जिल्ह्यात बाजार मांडला गेला असून, याला प्रकाराला जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची चांगली जाडीभरडी किनार आहे. कारण दिव्यांग प्रमाणपत्र देणारी यंत्रणा देवाणघेवाण करून धडधाकट लोकांनाही प्रमाणपत्र वाटपाचे काम करते.अशाप्रकारे दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन अनेक धडधाकट शिक्षक व कर्मचारी बदल्या, पदोन्नती यांचे लाभ उपटत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यात बऱ्याच ठिकाणी काही शासकीय

**बोगस दिव्यांग/अस्तिव्यंग प्रमाणपत्रावर विविध शासकीय लाभ व पदोन्नती घेणाऱ्या त्या ५३२ + २३ = ५५५ मिळालेल्या माहितीनुसार यांची ऑन केमेरा तपासणी करीता सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे प्रशासनाकडे पाठपुरावा करून पडदाफाश करणार असून खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळवून देणार**

विभागातील कर्मचाऱ्यांकडे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्याचे तपासात समोर आले होते. त्यानंतर तात्काळ त्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. याशिवाय विविध ठिकाणांहूनही बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची घेतल्याच समोर आलेले आहे. बुलढाण्यातील जिल्हा परिषद मधेच हा आकडा फारच मोठा आहे. त्यामुळे या प्रकरणी किती मोठा भ्रष्टाचार झाला असेल, हे स्पष्टपणे दिसून येत आहे. परंतु आता यामध्ये राज्य शासनाने आता निर्देश दिल्यामुळे अशा बोगस दिव्यांगांची नियमानुसार तपासणी केल्यास दोषींवर कारवाई होण्याची शक्यता वाढली आहे. या प्रकारामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेणाऱ्यांमध्ये व देणाऱ्यामधे घबराट पसरली असून, अनेकांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. जोपर्यंत बोगस दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नाही तसेच त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने या भ्रष्टाचार व गैरप्रकाराविरोधात आवाज उठवत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

# रस्ता सुरक्षा अभियान २०२६ बुलढाण्यात जिल्हा पोलीस दलाची धडाकेबाज बाईक रॅली; गुड समरीटन संदेशाने शहर दणाणले!

**जनसंचलन/बुलढाणा**

रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी बुलढाणा जिल्हा पोलीस दलाने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत आज जनजागृती बाईक रॅली काढून शहराचे लक्ष वेधून घेतले. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली आयोजित करण्यात आली. अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करणाऱ्या ङ्गराह-वीरफ अर्थात गुड समरीटन योजनेबाबत प्रभावी संदेश देत, मदत



करणाऱ्या व्यक्तीस ₹२५,००० बक्षीस दिले जाते तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीही कायदेशीर अडचण येत नाही, ही महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आली. अपघातग्रस्तांना मदत करा, भीती बाळगू नका हा ठाम संदेश या रॅलीतून देण्यात आला. पोलीस अधीक्षक कार्यालयातून सुरू झालेल्या या बाईक रॅलीला स्वतः पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आम्हा घरी धन डेटाचीच रत्ने...



एकविसाव्या शतकात डेटा हा केवळ संपत्ती नव्हे, तर डिजिटल संक्रमणाचा प्राणवायू झाला आहे. विसाव्या शतकात खनिज तेलाला जे महत्त्व प्राप्त झाले, तसेच वलय या शतकात डेटाभोवती निर्माण होत आहे. परंतु आयुष्याला गती आणि प्रकाश देणाऱ्या तेलाशी एका बाबतीत मात्र हा डेटा फारकत घेतो. तेलसाठे मर्यादित आहेत, तर डेटा मात्र अद्याप तरी अशा कोणत्या बंधन किंवा मर्यादांत अडकण्याची चिन्हे नाहीत. त्याचा आकार, व्याप्ती आणि गती दिवसेंदिवस वाढतच आहे. डिजिटल संक्रमणामुळे मानवी आहार-विहार आणि वर्तन-व्यवहारांच्या बहुतेक कक्षांमध्ये डेटाने प्रवेश केला आहे. ज्याच्या निर्मितीला आपण बहुतेक जण २४ तास कारणीभूत ठरतो, ज्याचे पुरवठादार आणि ग्राहकही आपणच होत आहोत, ती ही दोन अक्षरी जादू आहे तरी काय आणि तिचे महत्त्व, परिणाम-दुष्परिणाम व सुरक्षितता का आणि कशी महत्त्वाची आहे, हे समजून घ्यायला हवे. त्या संदर्भाने काही आकडेवारीवर नजर टाकू. २००३पर्यंत जगात दोन एक्झाबाइट (एक एक्झाबाइट म्हणजे एक अब्ज गिगाबाइट -जीबी) एवढ्या डेटाची उलाढाल झाली होती, जी सध्या दिवसागणिक होत आहे! २०२४मध्ये जगाने १४९ झेटाबाइट्स (एक झेटाबाइट म्हणजे एक हजार एक्झाबाइट) एवढ्या डेटाची उलाढाल केली. जगात आजवर निर्मिती झालेल्या डेटापैकी ९० टक्के हा फक्त २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांतील आहे आणि दर चार वर्षांनी त्यात दुपटीने भर पडत जाणार आहे! डेटाचा वापर व व्याप्ती वाढेल तसे त्याच्या जोखमींचे धोकेही वाढत आहेत. त्यामुळे डिजिटल संक्रमण जबाबदारीने पार पाडण्यासाठी या परिसंस्थेतील सर्व घटकांना काही पावले उचलावी लागत आहेत. ई-मेल किंवा मेसेजमधून दिशाभूल करून गोपनीय माहिती मिळवणे (फिशिंग), सायबरचाचेगिरी करून संगणक यंत्रणा ठप्प करून त्या चालू करण्याच्या बदल्यात खंडणी उकळणे (रॅनसमवेअर), बनावट संगणक प्रणाली वापरण्याला उद्युक्त करून मागील दाराने संगणक यंत्रणात घुसखोरी करणे अशा अनेक मार्गांनी हे हल्ले होतात. यामध्ये तो माहितीसाठा हाताळण्याचे अधिकार असणाऱ्या व्यक्तीच सहभागी होतात. यामध्ये बेजबाबदार किंवा अजाणत्या व्यक्तींकडून उद्भवणाऱ्या धोक्यांचाही समावेश होतो. भविष्यात एआय, क्वांटम गणना, ६-जी अशा भविष्यवेधी तंत्रप्रगतीमुळे डेटा प्रक्रियेची गरज व गती प्रचंड वाढणार आहे. ङ्गइंटरनेट ऑफ थिंग्जफ्मलीकडे जाऊन आता ङ्गइंटरनेट ऑफ बिहेविअर्सफ ही संकल्पना साकारली जात आहे. त्यामध्ये मानवी व्यवहारांचा अंदाज बांधणे आणि प्रसंगी त्यांना विशिष्ट वर्तनासाठी उद्युक्त करणे या दिशेने तंत्रविकासाचा विचार होत आहे. स्वाभाविकच त्यासाठी प्रत्येकाच्या वापरातील तंत्रसाधनांचे माहितीसंकलन व त्यांचा मेळ घालण्याला महत्त्व येणार आहे. माहितीसंकलन, तिचे पृथःकरण आणि त्यातून आर्थिक कमाई या स्वरूपातील व्यवसायाची वेगवेगळी प्रारूपे प्रस्थापित करून गुगल, ॲमेझॉन, फेसबुक, ॲपल, मायक्रोसॉफ्ट अशा तंत्र कंपन्यांनी अनेक देशांच्याही अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याएवढे महाकाय रूप धारण केले आहे. माहितीसाठा हेच त्यांच्या ङ्गमहासत्ताफ होण्याच्या वाटेवर पेरलेले बीज ठरले, हे स्वाभाविक आहे. त्यामुळे, डिजिटल भविष्य साकारण्यात कोणते देश यशस्वी ठरतात, याएवढेच कोणत्या कंपन्या त्याचे सर्वाधिक लाभ उठवतात, ही बाबही महत्त्वाची ठरणार आहे. भारतासाठी हे डिजिटल परिवर्तन जेवढे आव्हानात्मक तेवढेच संधींची दारेही खुली करणारे ठरणार आहे. या परिवर्तनाच्या दृष्टीने आपण जगात आघाडी घेणारी काही पावलेही उचलली आहेत. आधार ओळखपत्रे किंवा युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) व्यवस्था ही त्याचीच उदाहरणे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या व सर्वांत मोठी बाजारपेठ असणारा देश म्हणून आपण जगातील २० टक्के डेटाची उलाढाल करतो. परंतु फक्त तीन टक्के डेटा आपल्या देशातच साठवण्याची व्यवस्था करतो. ही साठवणूक क्षमता येत्या पाच वर्षांत चार पटींनी वाढवण्याचे नियोजन आहे, मात्र त्यासोबतच, माहितीसाठा गोपनीयतेसंबंधीच्या गरज व अधिकारांची पुरेशी जाणीव नसणे, छोट्या व मध्यम उद्योग-व्यवसाय संस्थांकडे डेटा सुरक्षिततेसाठीची ठोस व्यवस्था नसणे, डेटा साठवणे व त्याचे व्यवस्थापन यांसाठी परदेशी तंत्रसंस्थांवरील अतिअवलंबित्व अशा काही त्रुटीही दूर होणे गरजेचे आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजित दादांच्या निधनाने सरकारमध्ये पोकळी, शिंदे-फडणवीसांची सविस्तर चर्चा



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे राज्य सरकारमध्ये निर्माण झालेल्या पोकळीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात गुरुवारी रात्री सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. मुंबई महापालिकेतील महापौरपदाच्या निवडीचा निर्णय आता तातडीने करण्याऐवजी तो आणखी काही दिवस लांबणीवर टाकण्याबाबतही यावेळी चर्चा झाल्याचे समजते.अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे राज्यातील युती सरकारला मोठा धक्का बसला आहे. त्यांच्याकडे असलेल्या महत्त्वाच्या खात्यांवर त्याचा परिणाम होणार आहे. याशिवाय अजित पवार ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत त्या ठिकाणीही काहीसा संपर्क तुटणार आहे. अशावेळी वेळीच याबाबत योग्य त्या हालचाली करण्यासाठी मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांमध्ये ही चर्चा झाल्याचे समजते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पक्षनेता निवडीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. अशावेळी त्यांच्याकडून येणाऱ्या प्रस्तावांना तसेच, त्यांच्या कोट्यातील मंत्र्यांच्या खातेबदलाचा वा अन्य काही प्रस्ताव आल्यास त्यातून योग्य मार्ग काढण्याबाबत यावेळी चर्चा झाल्याचे कळते.मुंबई महापौरपदाबाबत ४ वा ५ जानेवारीला निर्णय घेण्याची तयारी सुरू होती. त्यानंतर लगेचच दोन ते तीन दिवसांनी कोकणात अंगणेवाडीची जत्रा असल्याने अनेक नगरसेवक तिकडे दर्शनासाठी जातात. त्यासाठीच त्यापूर्वी महापौरपदाची निवडणूक पार पडणार होती. मात्र आता अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे हा निर्णय काहीसा लांबणार असल्याचे समजते. दरम्यान, शिवसेना, भाजपमध्ये मतभेद असल्याने हा विलंब होत असल्याचा दावा शिवसेना उबाठाचे नेते संजय राऊत यांनी केला.अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसाचा शासकीय दुखवटा आहे. अशा परिस्थितीत राऊत यांना महापौर निवडीची घाई झाली आहे. शासकीय दुखवटा असताना महापौरपदासाठी बैठका घेणे, महापौर आमचा का तुमचा याबद्दल चर्चा करण्याची हीन वृत्ती राऊतांची आहे. मुंबई महापालिकेचा महापौर हा भाजप महायुतीचा होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढील आठवड्यामध्ये त्याबद्दलचा निर्णय घेतील', अशी प्रतिक्रिया भाजपच्या माध्यम विभागचे प्रमुख नवनाथ बन यांनी शुक्रवारी दिली.

## उपमुख्यमंत्रिपदी सुनेत्रा पवार



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर उपमुख्यमंत्रिपद कुणाकडे जाणार, या चर्चेला शुक्रवारी पूर्णविराम मिळाला. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची आज, शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी निवड होणार असून, त्या सायंकाळी पाच वाजता उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. सुनेत्रा यांनी ही जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यामुळे उपमुख्यमंत्रिपदी कोणाची निवड होणार, याबाबत चर्चेला वेग आला. मात्र, सुनेत्रा पवार यांनीच पक्षाची धुरा सांभाळावी आणि उपमुख्यमंत्रिपदाचीही जबाबदारी घ्यावी, अशी सर्वांची इच्छा असल्याचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर पटेल आणि तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केली. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांची बैठक झाली. त्यानंतर विधिमंडळ पक्षाचे गटनेतेपद स्वीकारण्यास सुनेत्रा पवार यांनी होकार कळवला.राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक शनिवारी दुपारी आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली. मुंबईबाहेरील आमदारांना पक्ष कार्यालयाकडून निरोप पाठविण्यात आला असून, तटकरे यांनीही फोन करून बैठकीविषयी कळवले आहे. पक्षाच्या आमदारांच्या उपस्थितीत गटनेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात येणार आहे. 'सुनेत्रा पवार यांनी पक्ष सांभाळावा, ही सर्वांचीच इच्छा असून त्यात कुणालाही आक्षेप असण्याचे कारण नाही.

## दुःखात दिलासा देणारी माणुसकीची भेट

**रायगड :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचे बुधवारी २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. अजितदादा हे लोकांमध्ये राहणारे नेते होते. नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक जीवनातील संकटातही अजित पवार सोबत उभे राहत असत याची असंख्य उदाहरणे आहे. पक्षीय भेदाभेद विसरून अजित पवारांनी संकटसमयी अनेकांना आधार दिला होता. असाच आधार रायगडमधील पाटील कुटुंबियांना अजित पवारांनी दिला होता. त्या आठवणीनं पाटील कुटुंबीय भावूक झाले आहेत.रायगड जिल्ह्यातील माजी मंत्री तथा शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांच्या निधन झाले. या दुःखद घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पेझारी येथे माजी आमदार पंडित पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबियांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. ही भेट केवळ राजकीय औपचारिकता नसून माणुसकीचा आधार देणारी ठरल्याची भावना आजही पाटील कुटुंबिय व्यक्त करत आहेत.

## सरकारी विमानं, हेलिकॉप्टर्सबद्दल महायुती सरकारचा महत्त्वाचा निर्णय



**मुंबई :** सरकारी विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या संदर्भात महायुती सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. बारामतीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याला मोठा धक्का बसला आहे. याच अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं सरकारी विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या संदर्भात निधी मंजूर केला आहे. याबद्दलचा जीआरदेखील काढण्यात आला आहे. अजित पवारांच्या विमानाला झालेल्या अपघाताची घटना ताजी असताना महायुती सरकारनं घेतलेला निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. हवाई वाहनांच्या तातडीच्या महत्त्वाच्या कामांसाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधीची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर आता वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीनं खर्चाला मंजुरी दिली आहे. प्रत्येकी ३ कोटींच्या २ पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून ६ कोटींची मागणी करण्यात आली होती. या पैशांमधून लहान बांधकामं केली जातील. सोबतच यंत्रसामुग्री, साधन सामग्रीची खरेदी केली जाईल.सरकारी हवाई वाहनांची देखभाल, दुरुस्ती वेळेत व्हावी, या हेतूनं ६ कोटी रुपयांच्या खर्चाला अर्थ विभागानं मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे आता सरकारच्या हवाई ताफ्यातील वाहनांच्या अत्यावश्यक कामांना गती मिळणार आहे. विमानांच्या आणि हेलिकॉप्टर्सच्या देखभाल, दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आलेला ६ कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्ष वितरीत केला जाणार आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या प्रस्तावावर अर्थ विभागानं शिक्कामोर्तब केलं आहे.

## मालेगावात विचारधारा बाजूला सारत भाजप-काँग्रेसची युती



**नाशिक :** मालेगाव महापालिकेत राजकारणाचे नवे वळण आले आहे. ज्या काँग्रेसवर भाजप नेहमी टीका करते, त्याच काँग्रेससोबत भाजपने हातमिळवणी केली आहे. महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीपूर्वी सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू असताना, काँग्रेसचे ३ आणि भाजपचे २ नगरसेवक एकत्र आले आहेत. त्यांनी 'भारत विकास आघाडी' या नावाने ५ नगरसेवकांचा गट स्थापन केला असून, काँग्रेसचे एजाज बेग या गटाचे नेते बनले आहेत. या युतीमुळे महापालिकेत इस्लाम पार्टीला पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.मालेगाव महापालिकेच्या निवडणुकीचा निकाल लागला असला तरी, महापौर आणि उपमहापौरपदाची निवड अद्याप बाकी आहे. सत्ता स्थापनेसाठी सर्वच पक्ष प्रयत्न करत आहेत. अशा परिस्थितीत, काँग्रेस आणि भाजप यांनी एकत्र येऊन एक अनपेक्षित राजकीय खेळी केली आहे. काँग्रेसचे तीन नगरसेवक आणि भाजपचे दोन नगरसेवक यांनी एकत्र येत 'भारत विकास आघाडी' नावाचा पाच सदस्यांचा गट तयार केला आहे. या गटाचे नेतृत्व काँग्रेसचे एजाज बेग करणार आहेत. या घडामोडीमुळे मालेगावच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे.मालेगाव महापालिकेत एकूण ८४ नगरसेवक आहेत. यामध्ये इस्लाम पार्टी चे ३५, एम.आय.एम. (अखचखच) चे २१, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) चे १८, समाजवादी पार्टी (डझ) चे ०५, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ०३ आणि भारतीय जनता पार्टी (इगझ) चे ०२ नगरसेवक आहेत. या पक्षीय बलाबलानुसार, इस्लाम पार्टी सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. मात्र, महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीसाठी इतर पक्षांची युती महत्त्वाची ठरणार आहे.महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला आरक्षण निघाल्याने महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. इस्लाम पार्टीचे प्रमुख आणि माजी आमदार आसिफ शेख हे महापौरपदाचा निर्णय घेणार आहेत. त्यांच्या बंधूच्या पत्नी, नसरीन शेख यांना महापौर होण्याची संधी मिळण्याची शक्यता जवळपास निश्चित झाली आहे. नियमानुसार, महापौर आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर ८ ते १२ दिवसांच्या आत महापौर आणि उपमहापौराची निवड करावी लागते. यासाठी महापालिकेची विशेष सभा बोलावली जाते. सभेच्या तीन दिवस आधी सर्व नूतन नगरसेवकांना सभेचा अजेंडा पाठवला जातो. आता ही विशेष सभा कधी बोलावली जाते आणि त्यात महापौराचे नाव जरी निश्चित मानले जात असले तरी, उपमहापौरपदी कोणाची वर्णी लागते याकडे मालेगाव शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. काँग्रेस आणि भाजपच्या या युतीमुळे महापालिकेत इस्लाम पार्टीला पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. यामुळे महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीचे गणित आणखी गुंतागुंतीचे झाले आहे.

राजकारणात कधी काय होईल याचा नेम नाही, हेच मालेगावच्या राजकारणात पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. काही दिवसांपूर्वी अकोटमध्ये भाजप आणि एमआयएम एकत्र आल्याची घटना घडली होती, पण राज्यभरात वाद झाल्यानंतर भाजपने माघार घेतली होती. मात्र, आता ज्या काँग्रेसवर भाजप नेहमी टीका करते, त्याच काँग्रेससोबत भाजपने मालेगावमध्ये हातमिळवणी केली आहे.

# एक इंजेक्शन अनब चार तासांनी इन्स्टा पोस्ट; साध्वी प्रेम बाईसा यांच्या मृत्यूचं गूढ सुटेना, वडिलांवर संशय

**जयपूर :** राजस्थानच्या जोधपूरच्या कथा वाचक २५ वर्षीय साध्वी प्रेम बाईसा यांच्या मृत्यूने संपूर्ण देशात खळबळ माजली आहे. बुधवारी २८ जानेवारीला त्यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, चुकीचं इंजेक्शन दिल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे. पण, आता या प्रकरणाला एक वेगळंच वळण आलं. बाप-लेकीचं नातं आणि जुन्या व्हिडिओमुळे या मृत्यूप्रकरणात सशंय वाढला आहे.गेल्या दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. साधना कुटीर आश्रम येथे एका कंपाउंडरला बोलावण्यात आलं. त्या कंपाउंडरने साध्वी यांना डेक्सोना (ऊशुपर) हे इंजेक्शन दिलं, इंजेक्शन लावल्याच्या काहीच वेळाने त्यांची प्रकृती अधिक बिघडली आणि त्या बेशुद्ध पडल्या. त्यांना त्यांचे वडील आणि गुरु वीरमनाथ यांनी तात्काळ जोधपूरच्या प्रज्ञा रुग्णालयात नेलं. मात्र, तोपर्यंत उशिर झालेला होता. डॉक्टरांनी त्यांना ब्रॉट डेड घोषित केलं.,एका इंजेक्शनना या साध्वीचा जीव कसा घेतला, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाला. नक्कीच यामागे काहीतरी मोठं षड्यंत्र असल्याचंही बोललं गेलं. राजस्थानच्या जोधपूर येथे साध्वी प्रेम बाईसा यांच्या गूढ मृत्यूने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. हे प्रकरण केवळ संशयास्पद मृत्यूपर्यंत मर्यादित नाही. तर, वर्षानुवर्षे घडलेल्या घटना, व्हायरल व्हिडिओ, कायदेशीर कार्यवाही आणि मृत्यूच्या दिवसाची परिस्थिती या सर्वांमुळे त्यांचा मृत्यू हा संशयास्पद बनला आहे.१३ जुलै २०२५ मध्ये सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फुटेजपासून या संपूर्ण प्रकरणाला सुरुवात झाल्याचं सांगितलं जात आहे. या





व्हिडिओमध्ये साध्वी प्रेम बाईसा या आपल्या खोलीत आहेत. तिथे एक व्यक्ती येतो आणि त्यांच्या गालांना स्पर्श करतो, त्यानंतर ते दोघं एकमेकांना मिठी मारतात. हा व्हिडिओ व्हायरल होताच एकच खळबळ माजली होती. कारण, साध्वी यांच्यासोबतची ती व्यक्ती तिचे वडील आणि गुरु वीरमनाथ होते. यानंतर साध्वी या नैराश्यात गेल्या होत्या आणि कुटुंबातही तणावाचं वातावरण होतं. यामुळे साध्वीचा जीव गेला का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.मात्र, तपासात हा व्हिडिओ २०२१ चा असल्याचे समोर आले आहे. या व्हिडिओच्या आधारे, २९ जुलै २०२२ ला कलम ३८४ अंतर्गत प्रथम गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात जोगेंद्र कुमार उर्फ जोगाराम यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले होते आणि नंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता. त्यानंतर, व्हिडिओ पुन्हा व्हायरल झाल्यानंतर, १६ जुलै २०२५ ला बोरानाडा पोलिस ठाण्यात आयपीसीच्या कलम ३८४ आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ अंतर्गत पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आणि चालान प्रक्रिया देखील पूर्ण झाली. याप्रकरणी २९ जुलै २०२२ रोजी साध्वी प्रेम बाईसा यांनी स्वतः एफआयआर दाखल केला होता. व्हिडिओ पुन्हा व्हायरल झाल्यानंतर, १६ जुलै २०२५ ला त्यांनी पुन्हा पोलिसांशी संपर्क साधला होता.

## शेतात गेले अन लेकाला पाहून वडिलांचा मन हेलावणारा टाहो

**छत्रपती संभाजीनगर :** वडाळा येथे एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोघांनी आपल्या आयुष्याची अखेर केल्याची घटना घडली आहे. दोघांनी आपला जीव दिल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. एकीकडे एका १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीने आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. तर, दुसरीकडे एका २० वर्षांच्या तरुणाने टोकाचे पाऊल उचलत आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण गावावर एकच शोककळा पसरली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, वडाळा येथील अल्पवयीन १६ वर्षीय विद्यार्थिनी गुरुवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास आपल्या धाकट्या बहिणीसह नेहमीप्रमाणे शाळेतून घरी परतली होती. यावेळी तिचे आई-वडील शेतात कामाला गेले होते. त्यामुळे घरी या दोघीच होत्या. काही वेळाने धाकटी बहीण खेळायला बाहेर गेली. तेव्हा या अल्पवयीन विद्यार्थिनीने घरातच गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. जेव्हा




तिचे आई-वडील शेतातील कामावरुन घरी परतले तेव्हा मुलीला गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहून त्यांना धक्काच बसला. त्यांनी तात्काळ तिला खाली उतरवलं आणि तातडीने सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात नेले. मात्र, तिथे डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले.तर, दुसऱ्या घटनेत, वडाळा गावातीलच जीवन संजय मानकर (वय २०) या तरुणाने गुरुवारी सायंकाळी साडे पाच वाजेच्या सुमारास शेतात झाडाला गळफास घेत आपली जीवनयात्रा कायमची संपवली. सायंकाळी त्याचे वडील शेतात गेले असता त्यांना जीवन हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला, लेकाला पाहून बापाने एकच टाहो फोडला.

## संतापलेल्या पतीने पत्नीला खाटेवरच संपवलं

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यात असलेल्या साखरे पाडा येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. दारूच्या नशेत असलेल्या पतीने आपल्या पत्नीची धार धार शस्त्राने वार करत निर्घुण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हत्या करणारा हा गावचा उपसरपंच असल्याचे समोर आले आहे.पत्नीची हत्या केल्यानंतर उपसरपंचाकडून स्वतः देखील विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या थरारक घटनेमुळे साकोरे पाडा गावावर शोककाळ पसरली असून व्यसनाधिनतेचा भयंकर चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. जयराम महारु पवार असे आरोपी उपसरपंचाच नाव असल्याचं समोर आलं आहे.साकोरे पाडा येथील रहिवासी आणि उपसरपंच जयराम महाहरू पवार (वय ६५) यांना दारूचे प्रचंड व्यसन होते. त्यांच्या या व्यसनामुळे घरात येणे पती-पत्नी यांच्यात वाद होत होते. त्यांच्या पत्नी या त्यांना दारू सोडवण्यासाठी नेहमी टोकत असत.

## १३ वर्षीय विद्यार्थिनीला शिक्षिका-मुख्याध्यापकांकडून बेदम मारहाण

**नागपूर :** शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया मानले जाते. शाळा म्हणजे ज्ञान, संस्कार आणि सुरक्षिततेचे मंदिर असते. मात्र नागपूर शहरातून समोर आलेल्या एका धक्कादायक घटनेने या संकल्पनेलाच तडा दिला आहे. सातवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीला किरकोळ कारणावरून शिक्षिका आणि शाळेच्या मुख्याध्यापकांनी बेदम मारहाण केल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संघर्ष नगर, पिवळी नदी परिसरात राहणारी ही विद्यार्थिनी २२ जानेवारी रोजी शाळेत हिंदीच्या तासाला उपस्थित होती. या दरम्यान तिने आपल्या मैत्रिणीकडून आरसा घेऊन दुसऱ्या विद्यार्थिनीला दिला. हा अगदी किरकोळ प्रकार असताना शिक्षिका तसलीम परवीन यांना याचा राग आला. कोणतीही चौकशी किंवा समज न देता त्यांनी विद्यार्थिनीला तब्बल पाच ते सहा जोरदार थापड मारल्या आणि वर्गाबाहेर



काढले, असा आरोप पीडितेने केला आहे.या प्रकारानेही समाधान न झाल्याने पुढे आणखी धक्कादायक घटना घडली. शाळेच्या मुख्याध्यापिका नासरीन अख्तर यांनी विद्यार्थिनीला कार्यालयात बोलावून घेतले. तेथे स्टीलच्या स्केलने तिच्या हात-पायांवर बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत विद्यार्थिनीला गंभीर दुखापती झाल्या असून ती मानसिक धक्क्यात गेली आहे. शाळेत सुरक्षित असल्याची भावना पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे पीडित कुटुंबीयांचे म्हणणे आहे. पीडितेच्या वडिलांनी सुरुवातीला शाळा प्रशासनाकडे तक्रार दाखल केली. मात्र कोणतीही ठोस कारवाई न करता प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप केला.

## लेकाने जीव दिला, मोबाईल रिकामा ; अस्वस्थ बापाकडून डेटा रिकव्हर

**आग्रा :** गेल्या वर्षी एका २१ वर्षांच्या तरुणाने आपल्या आयुष्याची अखेर केली होती. पण, आपला मुलगा असा अचानक इतकं टोकाचं पाऊल उचलेल यावर त्याच्या वडिलांचा विश्वास बसत नव्हता. त्यांना या घटनेबाबत संशय होता. कारण, मृत्यूपूर्वी मुलाच्या फोनमधील संपूर्ण डेटा डिलिट करण्यात आला होता. त्यांना वाटलं की यात काहीतरी गडबड नक्कीच आहे. तेव्हा या इंजिनिअर पित्याने आपल्या मुलाचा फोनमधील सर्व डेटा रिकव्हर केला. त्यानंतर जे सत्य समोर आलं, त्याने पोलिसांनाही चक्रावून सोडलं आहे. या प्रकरणाचे धागे थेट उत्तर प्रदेशातून महाराष्ट्रापर्यंत पसरल्याचं समोर आलं. हे प्रकरण सायबर क्राइमची संबंधित होतं. या प्रकरणात हाथरस पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.अहवालानुसार, हे प्रकरण ९ ऑक्टोबर २०२५ चं आहे. बीकॉमचं शिक्षण घेत असलेला आकाश सिंग याने आपल्या आयुष्याची



अखेर केली. जेव्हा याबाबत त्याच्या आई-वडिलांन कळालं तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. आपला मुलगा आता या जगात नाही, हे दु:खसहन करणं तसं सोपं नव्हतं. त्याने हा टोकाचा निर्णय का घेतला हे कळत नव्हतं. त्याचे वडील सुखवीर सिंग यांना त्याच्या या निर्णयामागील कारण जाणून घ्यायचं होतं. मृत्यूच्या काही दिवसांनी जेव्हा त्यांनी मुलाचा फोन बघितला तोव्हा त्यांना काहीतरी गडबड असल्याचं वाटलं, कारण त्याच्या फोनमधील सर्व डेटा गायब होता. त्याचा फोन रिसेट केल्याचा संशय त्याच्या वडिलांना आला. त्यांनी या मोबाईलचा सर्व डेटा रिकव्हर केला. तो डेटा पाहून त्यांना मोठा धक्का बसला. त्यांच्या मुलाला सतत ब्लॅकमेल केलं जात आहे. अनेक चॅट्स, रिकॉर्ड्स आणि कॉल लॉगही मिळाले. तसेच, मुलाचे अनेक मॉर्फ्ड फोटोही सापडले. त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर २८ ऑक्टोबरला हाथरस गेट पोलिसांत एफआयआर दाखल करण्यात आला.याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी एका वृद्ध व्यक्तीचा नंबर क्लोन केला होता. त्याचा वापर करत हे लोक विद्यार्थ्यांची फसवणूक करण्याचं काम करायचे. त्यांच्याकडून पैसे उकळायचे. आकाशने या लोकांना चार हफ्त्यात ४० हजार रुपये दिले होते. जर त्याने पैसे दिले नाही तर त्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतील अशी धमकीही त्याला देण्यात आली होती. यासर्वांनी कंटाळलेल्या त्याने अखेर आपली जीवनयात्रा संपवली.पोलिसांनी अनेक महिने तपास केला, तांत्रिक गोष्टीवर लक्ष ठेवलं, बँक अकाऊंट ट्रॅक केले. त्यानंतर डिजिटर पुराव्यांच्या आधारे सोमवारी महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथून रोहण बिहारीलाल सोनवणे आणि करण राजेंद्र चिंदालिया यांना अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान त्यांनी सांगितलं की, हे लोक महिला असल्याचं भासवून व्हॉट्सॲपवर वर्चुअल नंबर्सचा वापर करुन लोकांना फसवायचे. सध्या पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. तसेच, या टोळीतील काही आरोपी पुण्यात असल्याची माहिती मिळाल्याने एक पथक पुण्यालाही पाठवण्यात आलं आहे.

# मुंबई इंडियन्सची नाचक्की, इतिहासात प्रथमच असं घडलं; आता एकच गोष्ट वाचवू शकते

**वडोदरा/वृत्तसंस्था :** गुजरात जायंट्सने २०२६ च्या महिला प्रीमियर लीग एलिमिनेटरसाठी पात्रता मिळवली आहे. बीसीए स्टेडियमवर गुजरातने गतविजेत्या चीलरळ खपवळरपी ११ धावांनी पराभव केला. लीगच्या इतिहासात गुजरातचा मुंबई इंडियन्सविरुद्धचा हा पहिलाच विजय आहे. संघाने मागील सर्व आठ सामने गमावले होते. कर्णधार ॲशले गार्डनरच्या २८ चेंडूत ४६ धावांमुळे गुजरातने चार बाद १६७ धावा केल्या.गुजरात जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ४० लीग सामन्यांमध्ये पहिल्यांदाच एखाद्या संघाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बेथ मुनी आणि सोफी डेव्हाईन यांनी २.२ षटकांत पहिल्या विकेटसाठी २१



धावांची भागीदारी केली. बेथ मुनी फक्त पाच धावा देऊन बाद झाल्या, त्यानंतर अनुष्का शर्मा आणि सोफी डेव्हाईन यांनी ४३ चेंडूत दुसऱ्या विकेटसाठी ४८ धावा जोडल्या. अनुष्काने ३१ चेंडूत ३३ धावा केल्या, ज्यात एक षटकार आणि चार चौकारांचा समावेश होता.संघाने सोफी डेव्हिनची विकेट १०.१ षटकांच्या खेळापर्यंत गमावली, जी २१ चेंडूत ३ चौकारांसह २५ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. कर्णधार ॲशले गार्डनरने जॉर्जिया वेअरहॅमसह चौथ्या विकेटसाठी ४३ चेंडूत ७१ धावा केल्या. गार्डनरने २८ चेंडूत १ षटकार आणि ७ चौकारांसह ४६ धावांची खेळी केली. जॉर्जियाने २६ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह ४४ धावा केल्या आणि ती नाबाद राहिली. विरोधी संघाकडून अमेलिया केरने २६ धावांत २ बळी घेतले, तर शबनीम इस्मइल आणि नॅट सायव्हर-ब्रंटने प्रत्येकी १ बळी घेतला.मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने ४८ चेंडूत आठ चौकार आणि चार षटकारांसह ८२ धावांची शानदार नाबाद खेळी केली पण शेवटी ती संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. अमनजोत कौर १२ चेंडूत १३ धावा केल्या. शेवटच्या षटकात एमआयला विजयासाठी २६ धावांची आवश्यकता होती, परंतु हरमनप्रीतला फक्त दोन षटकार मारता आले. थझङ २०२६ एलिमिनेटरमधील दुसऱ्या संघाचा निर्णय अंतिम सामन्यात होईल. मुंबई इंडियन्सना आता रविवारी दिल्ली कॅपिटल्स आणि वॉरियर्स यांच्यातील सामन्याच्या निकालाची वाट पहावी लागेल. जर दिल्लीने हा सामना जिंकला तर थेट प्लेऑफसाठी पात्र पण जर वॉरियर्सने मोठ्या फरकाने जिंकला तर वॉरियर्स प्लेऑफसाठी पात्र ठरतील. जर वॉरियर्स कमी फरकाने जिंकले तर मात्र मुंबई पात्र ठरु शकते.

## मित्र असावा तर असा! सूर्याने दाखवला मनाचा मोठेपणा, आऊट ऑफ फॉर्म असलेल्या संजूसाठी केलं खास काम

**तिरुअनंतपुरम :** भारतीय क्रिकेट संघ तिरुअनंतपुरम येथील ग्रीनफील्ड स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्ध पाचवा आणि शेवटचा टी-२० सामना खेळणार आहे. भारत न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मालिका खेळत असून मालिका भारताने आधीच जिंकली आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील तीन सामने भारताने आधीच जिंकले आहेत. चौथा टी-२० सामना न्यूझीलंडने जिंकला. आता पाचव्या टी-२० सामन्यापूर्वी सूर्यकुमार यादव अँड संजू समसन व्हिडिओ व्हायरल होत आहे.




पाचव्या सामन्यासाठी भारतीय संघ तिरुअनंतपुरममध्ये पोहोचला आहे. जेव्हा संघ विमानातून उतरला आणि विमानतळावरून बाहेर पडत होता तेव्हा सूर्यकुमार आणि संजू एकत्र होते. सूर्यकुमारने तिथून संजूला चिडवण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, 'बाजूला जा, बाजूला जा. कृपया रस्ता मोकळा करा. चेट्टाला त्रास देऊ नका.यानंतर संजू एस्केलेटरवरून खाली उतरत असताना, सूर्यकुमारने संजूला विचारले की, 'देवभूमीत आल्यावर तुला कसं वाटतंय संजू?' संजूने उत्तर दिले, 'खूप छान वाटत आहे.' सूर्यकुमारने उत्तर दिले, 'हे नेहमीच चांगले वाटते, पण यावेळी ते खूप खास आहे.' मग, दोघे विमानतळाच्या बाहेर पडत असताना, सूर्यकुमार म्हणाला, सगळ्यांनी बाजूला व्हा बाजूला व्हा'. संजू हसत होता आणि त्याच्या सभोवतालचे सुरक्षा रक्षकही हसत होते. संजू निघून गेला तेव्हा तिथे उभे असलेले चाहते 'चेट्टा, चेट्टा' असे म्हणू लागले. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. संजू आणि सूर्या हे खूप चांगले मित्र आहेत अशी मस्ती करताना नेहमी पाहायला मिळते.संजूचा फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतील चार सामन्यांमध्ये त्याने फक्त ४० धावा केल्या आहेत. संजूला टी-२० विश्वचषकात सलामीवीर म्हणून खेळण्याचा विचार केला जात होता, परंतु तो अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरला आहे. तिरुअनंतपुरम टी-२० ही त्याची शेवटची संधी आहे. जर त्याने या सामन्यात चांगली कामगिरी केली नाही, तर इशान किशन विश्वचषकात अभिषेक शर्मासोबत सलामीला येऊ शकतो.

## पी.टी उषा यांच्यावर दु:खाचा डोंगर; पती व्ही. श्रीनिवासन यांचं निधन

**मुंबई :** भारतीय ओलिंपिक संघाच्या अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्य असलेल्या पी.टी. उषा यांच्या पती व्ही. श्रीनिवासन यांचे ६७ वर्षांच्या वयात निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे क्रीडा आणि राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे आणि देशभरातून श्रद्धांजली येत आहेत. कुटुंबीयांच्या सांगण्यानुसार, श्रीनिवासन यांनी ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी त्यांच्या कोझिकोड (केरळ) येथील घरात अचानक तब्येत बिघडली. ते बेशुद्ध पडल्यावर तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनतरही त्यांना वाचवता आले नाही.

व्ही. श्रीनिवासन हे केवळ उषा यांचे जीवन साथी नव्हते तर त्यांच्या खेळ आणि सार्वजनिक कारकिर्दीत उत्तम आधारस्तंभ होते. क्रीडा क्षेत्रातही त्यांचे योगदान आणि साहचर्याचे महत्त्व नेहमीच ओळखले गेले. ते पूर्वी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (उखडऋ) मध्ये अधिकारी म्हणून सेवा देत होते आणि त्यांच्या जीवनात क्रीडा आणि प्रशासन दोन्हीचा सहभाग होता. या दु:खद घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट पी.टी. उषा यांना फोन करून शोक व्यक्त केला आणि कुटुंबीयांना संवेदना दिली. तसेच केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनीही श्रीनिवासन यांच्या निधनावर दु:ख व्यक्त केले आहे.

पी.टी. उषा आणि श्रीनिवासन यांचे लग्न १९९१ मध्ये झाले होते आणि त्यांच्या एक मुलगा आहे. श्रीनिवासन हे उषा यांच्या करिअरमध्ये नेहमी त्यांचा पाठिंबा बनेले होते आणि त्यांच्या अनेक महत्वाच्या टप्प्यांवर सोबत होते. त्यांच्या अचानक निधनामुळे कुटुंबीय आणि चाहत्यांसाठी हा काळ अत्यंत कठीण बनला आहे.

# मॅचपूर्वी संघात होणार मोठा बदल, शेवटच्या सामन्यात मॅचविनरची एन्ट्री पक्की, दुखापतीतून सावरला

**तिरुवंनमपुरम/वृत्तसंस्था :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत पुनरागमन करणाऱ्या इशान किशनने आपल्या फलंदाजीने सर्वांची मने जिंकली. दोन वर्षांनी टीम इंडियात परतणाऱ्या खीहरप घळीहरप दुसऱ्या टी-२० मध्ये ३२ चेंडूत ७६ धावा केल्या आणि भारताला एकतर्फी विजय मिळवून दिला. चौथ्या टी-२० मधून बाहेर पडल्यानंतर, आता शेवटच्या टी-२० मधील त्याच्या सहभागाबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता पाचवा टी-२० सामना तो खेळणार की नाही ते पाहा...इशान किशन चौथ्या टी-२० मध्ये भारताकडून खेळू शकला नाही. सूर्यकुमार यादवने सांगितले होते की, त्याला




निगलची समस्या आहे. त्यामुळे संघाने दुसरा फलंदाज मैदानात उतरवला. इशान किशन च्या दुखापतीबद्दल, फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी पाचव्या टी-२० पूर्वी पत्रकार परिषदेत सांगितले की, 'इशान किशन आगामी सामना खेळू शकतो आणि पूर्णपणे तंदुरुस्त दिसत आहे.' अंतिम निर्णय सामन्यापूर्वी फिजिओच्या अहवालाच्या आधारे घेतला जाईल.२०२३-२४ च्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याच्या मध्यातच इशान किशनला संघातून वगळण्यात आले. त्यानंतर, राहुल द्रविडच्या कार्यकाळात, त्याला टीम इंडियामधून वगळण्यात आले आणि केंद्रीय करारातूनही काढून टाकण्यात आले.

इशान किशनने टिकून राहून, देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने धावा काढत, दोन वर्षांनंतर भारतीय टी-२० संघात पुनरागमन केले आणि स्वत:ला सिद्ध केले.इशान किशनने आतापर्यंत भारतासाठी ३५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने ९०८ धावा केल्या आहेत. आता, तो आगामी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये धमाल करण्याची तयारी करत आहे. भारताचा पाचवा आणि शेवटचा टी-२० सामना उद्या रंगणार आहे. हा सामना तिरुवंनमपुरम येथे खेळवला जाणार आहे. भारताने या टी-२० मालिकेतील तीन सामने जिंकल्यामुळे मालिका ही आधीच जिंकली आहे. चौथा सामना न्यूझीलंडने जिंकला. आता पाचवा सामना जिंकून ४-१ ने मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असणार आहे. पुढील महिन्यात टी-२० विश्वचषकाची स्पर्धा रंगणार आहे. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकामध्ये रंगणार आहे.

# सर्वांचीच डोकेदुखी ठरली अनुश्री माने!

**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६ च्या ३० जानेवारी २०२६ च्या भागाच्या सुरुवातीला गोल्डन रेशन कार्ड मिळण्यासाठी एक नवा टास्क खेळला जातो. त्याकरता स्पर्धकांना एकमेकांविरोधात परखड मतं व्यक्त करावी लागतात. बिग बॉस आदेश देतात की, एकाच टीमला हे गोल्डन रेशन कार्ड मिळेल आणि दुसऱ्या टीमकडे ब्रॉन्झ कार्ड कायम राहील. दोन टीममधील सदस्य एकमेकांसमोर उभे राहतील, कोण कोणाचं टार्गेट असेल हे वेळोवेळी जाहीर केलं जाईल, टार्गेट असणाऱ्या सदस्याचे हात बांधले जाती आणि त्याला शाब्दिक मारासह स्पंजच्या बॉलचा मारही ३ वेळा खावा लागेल, असा टास्क खेळवला जातो. बॉल कुठे म रला जातोय याकरता वेगवेगळे पॉइंट्सही दिले जातात. गुडघ्यापासून तळपायापर्यंत २५ पॉइंट, गुडघ्यापासून खांद्यापर्यंत ५० आणि खांद्यापासून डोक्यापर्यंत बॉल म रल्यास १०० पॉइंट मिळणार असतात. गोल्डन रेशन कार्डच्या टास्कसाठी अशा



टीम जाहीर केल्या जातात की, टीम ए- विशाल, रुचिता, दीपाली, सागर, सचिन, सोनाली, अनुश्री, रोशन आणि टीम बी- राकेश, प्रभू, करण, आयुष, ओमकार, दिव्या, प्राजक्ता, तन्वी. यावेळी दिव्या- अनुश्री या कार्याच्या संचालक असतात. ज्या टीमला सर्वाधिक पॉइंट मिळतील, त्यांना गोल्डन रेशन कार्ड मिळेल असे जाहीर केले जाते.पहिल्या फेरीत प्राजक्ता टार्गेट असते आणि तिला लक्ष्य करायचं काम अनुश्रीवर असतं. दोघींमध्ये 'क्लास' या मुद्द्यावरुन वाद होतो. अनुश्रीला केवळ ५० पॉइंट मिळतात. त्यानंतर प्राजक्ता अनुश्रीविषयी तक्रार सांगते आणि ती १५० गुण मिळवून जाते. त्यानंतर रोशन आणि करण एकमेकांसमोर येतात. करणने म रलेला एकही बॉल रोशनला लागत नाही, तर रोशनही तेच करतो. विशाल-ओमकार समोरासमोर येतात तेव्हा विशालला १०० गुण मिळतात, तर ओमकारला १५० गुण मिळतात. सागरबद्दल तक्रार व्यक्त करण्यासाठी प्रभू येतो. प्रभूला १०० गुण तर सागरला ० पॉइंट मिळतो. त्यानंतर रुचिता ाि दिव्या यांच्या फेरीतही दोघींना ० पॉइंट मिळतात. त्यानंतर दीपाली आणि राकेश आमनेसामने येतात. पूर्वी दोघे चांगले मित्र होते, पण आता त्यांच्यात फूट पडल्याने ते एकमेकांना टोचून बोलतात. यावेळी दीपालीला शून्य गुण, तर राकेशला १०० गुण मिळतात.त्यानंतर तन्वी विरुद्ध सोनाली एकमेकींसमोर येतात. सोनाली तन्वीला आयुषसोबतचा लव्ह अँगलबद्दल डिवचते. सोनालीचं असं म्हणणं असतं की, 'आयुषने स्वत:हून मला सांगितलेलं की, मला हा शो खूप महत्वाचा आहे. मला पुढे जायचंय, माझे एचख वगैरे आहेत... त्यामुळे शो मी खूप गांभीर्याने घेतो आहे. तन्वीबरोबर मी अँगल बनवेन आणि तिला स्विमिंग पूलमध्ये ढकलेन.' आयुषचं म्हणणं असतं की, अँगल हा मुद्दा सोनालीने स्वत:हून तयार केला आहे. तन्वीही सोनालीवर भडकते. सोनालीने आयुषच्या वक्तव्यात मसाला टाकला आहे, असं तन्वी म्हणते. सोनाली असंही म्हणते की, तन्वीच्या स्वभावामुळे घरात तिचं कोणीही मित्र नाही. या मुद्द्यावर तन्वी आणखी भडकते आणि ओक्साबोक्शी रडू लागते.जेव्हा विशाल तन्वीला सांगतो की, तिला कोणीही पर्सनल बोलत नाहीये, तेव्हा तन्वी खूपच भडकते. दोघे एकमेकांवर आवाज चढवतात. तन्वी त्याच्याकडे धावून जाते, घरातील इतर सदस्यांना मध्यस्थी करुन त्यांना थांबवावं लागतं. या फेरीत सोनालीला ० गुण मिळतात, तर तन्वीलाही ० गुण मिळवतात. सचिन ाि आयुष या फेरीत सचिनला १५० गुण मिळतात, आयुषला ० गूण मिळाले. या टास्कमध्ये टीम बी जिंकते आणि त्यांना गोल्डन रेशन कार्ड मिळते. त्यामुळे त्यांना आतापर्यंत घरात न आलेले लग्झरी प्रोडक्ट मिळतात.या लग्झरी प्रोडक्टमध्ये वेफर्स,

## 'आफ्टर ओ.एल.सी'मध्ये मिळणार दमदार अ‍ॅक्शन आणि थराराची पर्वणी

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेला बहुप्रतिक्षित अ‍ॅक्शनपट 'आफ्टर ओ.एल.सी' अखेर आपल्या प्रदर्शनाच्या तारखेसह सज्ज झाला आहे. अनेक दिवसांपासून प्रेक्षक ज्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते, तो हा दमदार अ‍ॅक्शन-थरारपट ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटामुळे मराठी सिनेसृष्टीत पुन्हा एकदा वेगळ्या धाटणीच्या अ‍ॅक्शन सिनेमाची लाट येणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

'आफ्टर ओ.एल.सी'चा ट्रेलर प्रदर्शित होताच त्यातील तगडी अ‍ॅक्शन, रहस्यमय कथानक आणि थरारक प्रसंगांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. प्रत्येक फ्रेममध्ये दिसणारी वेगळी ऊर्जा, वेगवान घडामोडी आणि उत्कंठावर्धक मांडणीमुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता प्रचंड वाढली आहे. हा सिनेमा केवळ अ‍ॅक्शनपुरताच मर्यादित न राहता, रहस्य आणि भावनिक पैलूंनाही स्पर्श करतो, असा अंदाज ट्रेलरवरून लावला जात आहे.

चित्रपटात कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट म डके, अश्विनी चवरे यांच्यासह अनेक मराठी कलाकारांची दमदार




फळी पाहायला मिळणार आहे. प्रत्येक कलाकाराने आपल्या भूमि केत प्राण ओतल्याने कथानक अधिक प्रभावी आणि वास्तवदर्शी झाल्याचे दिसून येते. विशेषतः अ‍ॅक्शन सीक्वेन्स आणि थरारक प्रसंगांमध्ये कलाकारांचा अभिनय प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा ठरणार आहे.

## मर्दानी ३ करणार ग्रँड ओपनिंग; अ‍ॅडव्हान्स बुकिंगमध्ये बंपर कमाई

**मुंबई :** राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रावच्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर परतणार आहे. राणीचा चित्रपट, मर्दानी ३, शुक्रवारी प्रदर्शित होत आहे. चित्रपटाच्या ट्रेलरला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे अ‍ॅडव्हान्स बुकिंगलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. मर्दानी आणि मर्दानी २ हिट झाल्यानंतर आता या चित्रपटाचा तिसरा भाग कसा असेल हे जाणून घेऊयात.

अहवालानुसार, चित्रपटाने ब्लॉक बुकिंगसह २.३३ कोटी कमावले. तर मर्दानी ३ पहिल्या दिवशी ३ कोटींपर्यंत कमावेल अशी अपेक्षा आहे. तर, चित्रपट पहिल्या आठवड्याच्या शेवटी ११-१३ कोटी कमावेल असा अंदाज लावण्यात येत आहे. तसेच, मर्दानी ३ एकूण ६०-७० कोटी कमावेल. मर्दानीच्या पहिल्या भागाने पहिल्या दिवशी ३.४० कोटी आणि जगभरात एकूण ५९.३० कोटी कमावले. दरम्यान, मर्दानी २ ने पहिल्या दिवशी ३८ दशलक्ष आणि जगभरात ६७ दशलक्ष कमावले. आता लवकरच मर्दानी ३ किती कोटींची कमाई करण्यात यशस्वी होईल हे लवकरच कळेल. अभिराज मि नावाला दिग्दर्शित आणि आदित्य चोप्रा निर्मित 'मर्दानी ३' हा चित्रपट सामाजिक विषयांवर आधारित आहे. या चित्रपटात राणी मुखर्जीसह या खलनायिकेची भूमिका साकारत आहेत अभिनेत्री मल्लिका प्रसाद आणि अभिनेत्री जानकी बोडीवाला या चित्रपटात दिसणार आहेत.

# चक्क २ वेळा मृत्यूला दिला चकवा, वडिलांच्या निधनाची बातमी वाचून धक्का

**मुंबई :** बॉलिवूडमध्ये कित्येक सिनेमे दर आठवड्याला रिलीज होत असतात. त्यात वेगवेगळ्या अभिनेत्री पाहायला मिळतात. पण या इंडस्ट्रीत अशाही काही अभिनेत्री आहेत ज्या आता फिल्म इंडस्ट्रीत किंवा सिनेमांमध्ये फारशा सक्रिय नसल्या तरी प्रेक्षकांच्या मनातली त्यांची छाप काही कमी झालेली नाही. आज अशाच एका अभिनेत्रीचा वाढदिवस आहे.ही बॉलिवूडची बबली अभिनेत्री म्हणजे प्रिती झिंटा . आज प्रितीचा ५१ वा वाढदिवस आहे. आपल्या आयुष्याबाबत प्रीती झिंटने एकदा म्हटले होते, 'स्वप्ने सत्यात उतरतात.' प्रीतीचे जीवन संघर्ष, कठोर परिश्रम आणि धैर्याचे उदाहरण आहे, ज्याने तिला एका सामान्य मुलीपासून एका आघाडीची बॉलीवूड अभिनेत्री बनवले.हिमाचल प्रदेशातील शिमला येथे ३१ जानेवारी १९७५ रोजी प्रीती झिंटाचा जन्म झाला. ती एका लष्करी कुटुंबातून आली आहे. तिचे वडील दुर्गाचंद झिंटा हे भारतीय



सैन्यात अधिकारी होते आणि तिच्या आईचे नाव नीलप्रभा झिंटा होते. प्रीतीने तिच्या वडिलांना खूप लहान वयातच गमावले. त्यांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला. या अपघाताने प्रीतीचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेले आणि लहान वयातच कुटुंबाची जबाबदारी तिच्या खांद्यावर आली.प्रीती झिंटाने तिच्या कारकिर्दीची सुरुवात मॉडेल म्हणून केली होती. तिने 'दिल से' (१९९८) मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, या सिनेमात तिने शाहरुख खानसोबत स्क्रीन शेअर केली होती. खरेतर ती शेखर कपूरच्या 'तारा रम पम' मधून पदार्पण करणार होती, परंतु तो प्रोजेक्ट रद्द करण्यात आला. 'दिल से' नंतर, प्रीतीने 'सोल्जर', 'क्या कहना', 'कल हो ना हो', 'वीर-झारा' आणि 'कोई मिल गया' सारख्या सुपरहिट चित्रपटांमधून ओळख निर्माण केली. तिच्या निरागसतेमुळे आणि एनर्जीने तिला प्रेक्षकांचे लक्ष वेधलेप्रीती झिंटा दोनदा मोठ्या दुर्घटनेतून थोडक्यात बचावली. २००४ मध्ये, कोलंबोच्या एका संगीत कार्यक्रमात मोठा स्फोट झाला आणि ती थोडक्यात जखमी झाली. त्यानंतर, ती थायलंडमध्ये सुट्टी घालवत असताना त्सुनामी आली. या दोन्ही घटनांनी तिला आयुष्याचे मूल्य शिकवले.प्रीती झिंटा तिच्या निर्भय आणि स्पष्टवक्त्या प्रतिमेसाठी इंडस्ट्रीमध्ये ओळखली जाते. भरत शाह प्रकरणात तिने निर्भयपणे साक्ष दिली, जी त्या काळातील कोणत्याही सेलिब्रिटीसाठी एक महत्त्वाची कामगिरी होती. यामुळे तिला 'अंडरवर्ल्डला निर्भिडपणे तोंड देणारी महिला' असे देखील म्हटले जाते.प्रीती झिंटाने ऋषिकेशमधील एका अनाथाश्रमातून ३४ मुलींना दत्तक घेतले असून त्यांची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे. हे फार कमी लोकांना माहिती असेल. तिला इस्ट लंडन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट देखील मिळाली आहे. प्रीतीने हार्वर्ड विद्यापीठातून डील-मेकिंग आणि नेगोशिएशनचा कोर्स देखील पूर्ण केला आहे.प्रीती झिंटाचे प्रेम जीवन नेहमीच चर्चेत राहिले आहे. तिचे नाव युवराज सिंग, शेखर कपूर आणि नेस वाडिया यांच्याशी जोडले गेले आहे. पण तिने २९ फेब्रुवारी २०१६ रोजी लॉस एंजेलिसमध्ये तिचा अमेरिकन बॉयफ्रेंड जीन गुडइनफशी लग्न केले. प्रीती झिंटाच्या आगामी चित्रपटांमध्ये 'लाहोर १९४७' हा बहुप्रतिक्षित चित्रपट, जो सनी देओलसोबत राजकुमार संतोषी दिग्दर्शित करत असून तो एक पीरियड ड्रामा आहे, तसेच 'क्रिश ४' आणि 'सोल्जर २' सारख्या सिक्वेलमध्येही ती काम करु शकते असे म्हटले जात आहे. मात्र या दोन चित्रपटांबद्दल अद्याप माहिती मिळालेली नाही. तिने 'द गुड महाराजा' सारखे प्रोजेक्ट देखील पूर्ण केले आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ॲड.जयश्रीताई शेळके यांच्या हस्ते यशस्वी तरुणांचा सत्कार...

## नांद्रकोळी गावाचा अभिमान : एकाच वेळी पाच तरुणांची भारतीय सुरक्षा दलात निवड

जनसंचलन/बुलढाणा

येथील एकाच गावातून तब्बल पाच तरुणांची भारतीय सुरक्षा दलांमध्ये निवड होणे ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे. प्रविण संजय चौधरी (), गणेश राजू शिंदे (), आकाश प्रकाश राऊत (), सचिन गणेशराव राऊत () आणि दिलीप अर्जुन उबाळे () या पाची तरुणांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर देशसेवेचा मान मिळवला आहे. विशेष म्हणजे हे सर्व तरुण शेतकरी कुटुंबातून आलेले असून, आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या बळावर हे यश संपादन केले आहे. आजचा तरुण बेरोजगारी, स्पर्धा आणि सामाजिक तणावामुळे निराशेकडे झुकत असताना, नांद्रकोळीच्या या पाच तरुणांनी कठोर परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या



जोरावर यश संपादन करून आशेचा नवा किरण निर्माण केला आहे. त्यांच्या यशामुळे तरुणांनी निराशेला दूर सारून ध्येयवादी व देशसेवेची वाट निवडावी, असा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला आहे. या सर्वांबरोबरच नांद्रकोळी गावचेच विष्णू पुंडलिक उबाळे हे मागील दोन वर्षांपासून मिझोराम येथे मध्ये कार्यरत असून, ते देखील गावासाठी अभिमानाचे प्रतीक ठरत आहेत. या यशस्वी तरुणांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना जयश्रीताई शेळके म्हणाल्या की, ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील तरुणांनी देशसेवेच्या माध्यमातून मिळवलेले हे यश संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे. अशा तरुणांच्या पाठीशी समाज आणि शासनाने भक्कमपणे उभे राहिले पाहिजे.फक्त यावेळी नांद्रकोळी गावचे उपसरपंच मनोज जाधव, भानुदास हुडेकर, अशोक हुडेकर, नाना राऊत, राहुल चौधरी, परमेश्वर वानखेडे उपस्थित होते.

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन...

जनसंचलन/बुलढाणा





जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी व अडचणींचे निरसन करण्यासाठी सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आले आहे. अर्जदारांनी अर्ज करतांना स्विकृतीचे निकष : अर्ज विहित नमुन्यात केलेला असावा, तक्रार किंवा निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी, चारही स्तरांवरील लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहित नमून्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील, तालुका लोकशाही दिनानंतर एका माहिन्यांने जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज करता येईल, जिल्हाधिकारी लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी विभागीय आयुक्त लोकशाही दिनात व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर दोन महिन्यांनी मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल. हे अर्ज स्विकारले जाणार नाहीत : न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल्स, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर, वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे आवश्यक कारवाईसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी दिली आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी

जनसंचलन/बुलढाणा

महात्मा गांधीं यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या तत्त्वांवर आधारित भारतीय समाजात आमूलाग्र सामाजिक बदल घडवून आणले. असे प्रतिपादन मॉडल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ अण्णासाहेब म्हळसणे यांनी केले . बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेज येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते पुढे म्हणाले की त्यांनी महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारण, महिला सक्षमीकरण, हिंदू-मुस्लिम एकता, आणि स्वदेशी चळवळीद्वारे आत्मनिर्भरतेवर भर दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. किं वा वाघ, प्रा. देशमुख , प्रा. डॉ. महेश व्यवहारे, आणि प्राध्यापिका प्राजक्ता काळे , मनीषा राऊत यांनी सुद्धा महात्मा गांधी यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन प्राध्यापिका दीक्षा जाधव यांनी केले. यासारखा मला कॉलेजमधील प्राध्यापक प्राध्यापक इतर कर्मचारी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा विद्युत तारेचा जबर शॉक तिसऱ्या मजल्यावरून कोसळून मृत्यू - देऊळगाव महीत खळबळ

जनसंचलन/ देऊळगाव मही

शहरातील छत्रपती चौक परिसरात आज शनिवारी सकाळी एक हृदयद्रावक घटना घडली. बांधकामावर पाणी मारत असताना अचानक मेन लाईनच्या विद्युत तारेचा जबर शॉक लागून सेवानिवृत्त कर्मचारी संतोष गंगाराम आरमाळ (वय ६२, रा. शिवणी आरमाळ, ह. मु. देऊळगाव मही) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, संतोष आरमाळ यांचे छत्रपती चौकात नवीन घराचे बांधकाम सुरू आहे. नेहमीप्रमाणे सकाळी साडेआठच्या सुमारास ते तिसऱ्या मजल्यावर पूर्ण झालेल्या भागावर पाणी मारण्यासाठी गेले होते. याचवेळी घरासमोरून गेलेल्या विद्युत मेन लाईनच्या तारेचा नकळत संपर्क झाल्याने त्यांना जोरदार विद्युत शॉक बसला. शॉकच्या तीव्रतेमुळे ते थेट तिसऱ्या मजल्यावरून खाली कोसळले. घटनास्थळी आरडाओरड होताच जवळील नातेवाईकांनी तातडीने धाव घेऊन त्यांना जखमी अवस्थेत देऊळगाव मही ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी जालना येथील कलावती हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. तेथे दाखल करताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. कै. संतोष आरमाळ हे कै. लक्ष्मीबाई माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी आरमाळ येथील सेवानिवृत्त प्रयोगशाळा



परिचर होते. जिल्हा परिषद शाळा अंढेरा (सेवानगर) येथील शिक्षक हरी आरमाळ यांचे ते वडील होत. या दुर्दैवी घटनेने देऊळगाव मही परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा मेडिकल कॉलेजला स्व. अजितदादांचे नाव-डॉ. राजेंद्र शिंगणे



**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व सर्वसामान्यांचे लाडके नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाती निधनाने संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले असताना, बुलढाणा जिल्ह्यात मात्र त्यांच्या कार्याचा ठसा जिवंत ठेवण्यासाठी ठोस मागणी पुढे आली आहे. बुलढाणा येथील सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी एकमुखाने बुलढाणा मेडिकल कॉलेजला स्व. अजितदादांचे नाव देण्याची जोरदार मागणी केली आहे. आज बुलढाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेला विद्यमान व माजी आमदार, खासदार, विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, बुलढाण्यात मेडिकल कॉलेज उभे राहण्यामागे स्व. अजितदादांचा सिंहाचा वाटा आहे. सर्वांचा पाठपुरावा होता, पण शासनस्तरावरून विशेष आणि निर्णायक पाठपुरावा अजितदादांनीच केला. मेडिकल कॉलेजसाठी आवश्यक असलेला प्रारंभिक निधी, मंजुरी आणि प्रशासनावरचा दबाव हे सर्व अजितदादांच्या माध्यमातूनच शक्य झाले, असेही डॉ. शिंगणे यांनी ठणकावून सांगितले. त्यामुळे या मेडिकल कॉलेजला स्व. अजितदादांचे नाव देणे ही केवळ भावना नसून त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान असल्याचे मत सर्वपक्षीय नेत्यांनी व्यक्त केले. याचबरोबर बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पाला स्वर्गीय माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे यांचे नाव देण्यात यावे, अशीही सर्वपक्षीय मागणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व आमदार, माजी आमदार व खासदार मिळून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी अधिकृतपणे मांडणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## डुलकी पडली अन् क्षणात होत्याचं नव्हतं!

### समृद्धी महामार्गावर ट्रक पलटी, थरारक दृश्ये...



**जनसंचलन/ डोणगाव**

समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका थांबायचे नाव घेत नसून, काल गुरुवार ३० जानेवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास आणखी एक भीषण अपघात घडला. चालकाला आलेली झोपेची डुलकी या अपघाताचे मुख्य कारण ठरले असून,नागपूर कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक २६८ जवळ भरधाव ट्रक महामार्गावरून खाली उतरून पलटी झाला. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी टळली आहे मिळालेल्या माहितीनुसार, बारदाना (रिकामी पोती) भरलेला ट्रक ( २३ ६४१७) मुंबईहून नागपूरच्या दिशेने जात होता. डोणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत चालक सुनील कुमार मोरया याला अचानक डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक थेट पलटी झाला. अपघातात चालक किरकोळ जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. चालक व वाहकाला सुरक्षितपणे ट्रकबाहेर काढून रुग्णवाहिकेच्या मदतीने मेहकर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, अपघातग्रस्त ट्रकमधील मालाची चोरी होऊ नये म्हणून डोणगाव पोलिसांनी घटनास्थळी चोख बंदोबस्त ठेवला.

# रेल्वेतून पडून अनोळखी युवकाचा मृत्यू



**जनसंचलन/ नांदुरा**

रेल्वे स्थानकाजवळ दहिगाव परिसरात धावत्या रेल्वेगाडीतून पडून एका अनोळखी युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवार, १ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास घडली. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याचे वय अंदाजे ३५ वर्षे, उंची सुमारे ५ फूट ५ इंच, रंग सावळा असून, अंगात पांढरा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेली होती. घटनेची माहिती मिळताच नांदुरा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस उपनिरीक्षक मोरे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. यावेळी ओमसाई फाउंडेशनचे विलास निंबोळकर, राहुल निमकर्डे, आश्विन फेरण, विष्णू धांडे, कृष्णा वसोकार, नितीन ठाकरे, वैभव राहणे व रोहित भोपळे यांनी सहकार्य केले. अनोळखी मृत व्यक्तीबाबत माहिती असल्यास पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले

# डोणगाव दौऱ्यात तहसीलदार प्रतिक्षाताई तेजनकर यांचा सन्मानपूर्वक सत्कार!

**जनसंचलन/बुलढाणा**

रिसोडच्या तहसीलदार प्रतिक्षाताई तेजनकर यांना स्व. चतुराबाई स. पळसकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा ङ्गराजमाता माँ जिजाऊ पुरस्कारफ जाहीर झाल्याबद्दल, डोणगाव पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. शनिवार, १ फेब्रुवारी रोजी तहसीलदार प्रतिक्षाताई तेजनकर व रिसोडचे ठाणेदार संतोष अघाव हे डोणगाव दौऱ्यावर आले असता, पत्रकार संघाने त्यांचे उत्साहात स्वागत केले. प्रशासकीय कामकाजात दाखवलेली तत्परता, लोकाभिमुख निर्णय आणि जनसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, यामुळे सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. या सत्कार प्रसंगी डोणगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन गाभणे, उपाध्यक्ष ॲड. जैनुल आबेद्दीन



शेख, सचिव सुबोध आखाडे, मार्गदर्शक अशोकराव वानखेडे यांच्यासह सदस्य जमील पठाण, आवेज पठाण, अनिल राठोड, गणेश लहाने, राजेश वाघमारे, सुरेश फिसके, देविदास खनपटे उपस्थित होते. तसेच माजी कृषी सभापती राजेंद्र पळसकर, सकाळचे बातमीदार राम लहाने व इतर पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८